**ठळक बातम्या**

- देशभरात सुरू असलेल्या जीएसटी बचत महोत्सवामुळे नागरिकांमध्ये खूप उत्साह असल्याचं प्रधानमंत्र्यांचं 'मन की बात' मध्ये प्रतिपादन

- फलटणमध्ये १ हजार ३५२ कोटी रुपये खर्चाच्या विविध विकास कामांचं मुख्यमंत्र्यांच्या हस्ते भूमिपूजन आणि लोकार्पण

- राष्ट्रीय विज्ञान पुरस्कारांमधे जयंत नारळीकर यांना मरणोत्तर विज्ञानरत्न पुरस्कार जाहीर /नागपूरच्या नीरीचे संचालक डॉ. एस. वेंकट मोहन, यांना ‘विज्ञान श्री’ पुरस्कार

**आणि**

- आयसीसी महिला क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारत-बांगलादेश सामन्यात पावसाचा व्यत्यय

**<><><><><>**

देशभरात सध्या जीएसटी बचत महोत्सव सुरू असून यामुळे नागरिकांमध्ये खूप उत्साह आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. आकाशवाणीवरच्या 'मन की बात' या कार्यक्रमातून त्यांनी देशवासीयांशी संवाद साधला. हा या कार्यक्रमाचा १२७वा भाग होता. यंदाच्या सणासुदीच्या काळात स्वदेशी वस्तूंची खरेदी प्रचंड वाढली असल्याचं त्यांनी सांगितलं.

ऑपरेशन सिंदूरनं प्रत्येक भारतीयाला अभिमानानं भारून टाकलं आहे. कधीकाळी नक्षलवाद्यांची दहशत असलेल्या प्रदेशांमध्येही नक्षलवादाविरोधी कारवाईमुळं यंदाच्या सणात आनंदाचे दीप प्रज्वलित झाले, असं सांगून, नक्षलवादाचं समूळ उच्चाटन करायच्या ध्येयाचा पुनरुच्चार त्यांनी केला.

प्रधानमंत्र्यांनी देशवासीयांना छठ पूजेच्या शुभेच्छा दिल्या. संस्कृत भाषेचं महत्व आणि तिच्या संवर्धनासाठी होत असलेल्या प्रयत्नांची माहितीही त्यांनी दिली. यासाठी युवा वर्ग करत असलेल्या प्रयत्नांमुळे आनंद वाटत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाविषीच्या अभिनव उपक्रमांबद्दल प्रधानमंत्र्यांनी माहिती दिली. सागरी परिसंस्थेच्या जतन संवर्धनासाठी खारफुटीचं महत्व त्यांनी अधोरेखित केलं.

आपणही जिथं राहतो तिथं झाडं लावावीत, एक पेड़ माँ के नाम ही मोहीम आणखी पुढे न्यावी असं आवाहन त्यांनी केलं.

येत्या ३१ ऑक्टोबरला लोहपुरुष सरदार पटेल यांच्या जयंतीदिनाचं स्मरण करून, प्रधानमंत्र्यांनी पटेल यांच्या योगदानाला उजाळा दिला. यानिमित्त देशभरात आयोजित होणार असलेल्या ‘रन फॉर युनिटी’ मध्ये सहभागी व्हावं, असं आवाहन त्यांनी केलं.

येत्या ७ नोव्हेंबर रोजी, वंदे मातरम्, या राष्ट्रीय गीताच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवाला प्रारंभ होणार असल्याचं त्यांनी सांगितलं आणि या गीताचं महत्त्व विषद केलं. यानिमित्त देशभरात अनेक कार्यक्रमांचं आयोजन केलं जाणार असल्याचं त्यांनी सांगितलं आणि यासाठी नागरिकांनी आपल्याला सूचना पाठवाव्यात असं आवाहनही केलं.

निजामाच्या अन्यायाविरोधात लढा देणाऱ्या कोमरम भीम यांची २२ ऑक्टोबरला जयंती झाल्याच्या निमित्तानं प्रधानमंत्र्यांनी त्यांच्या योगदानाला उजाळा दिला. तसंच १५ नोव्हेंबरच्या आदिवासी गौरव दिनानिमित्त भगवान बिरसा मुंडा यांनाही त्यांनी आदरांजली वाहिली.

भारतीय वंशाचे श्वान आजूबाजूच्या परिस्थितीशी सहजपणे जुळवून घेणारे असतात, त्यामुळे, यापूर्वी देशवासीयांना आणि सशस्त्र दलांना भारतीय जातीचे श्वान

पाळायचं आवाहन केल्याचं स्मरण प्रधानमंत्र्यांनी करून दिलं. त्याला प्रतिसाद देत सीमा सुरक्षा दल आणि केंद्रीय राखीव पोलीस दलानं पथकांमध्ये भारतीय वंशाच्या श्वानांची संख्या वाढवल्याची माहिती त्यांनी दिली, तसंच सीमा सुरक्षा दलानं श्वानांना भारतीय नावं द्यायची परंपरा सुरू केल्याचंही त्यांनी सांगितलं. यादृष्टीनंच महाराष्ट्र आणि कर्नाटकातल्या मुधोळ हाउंड, आणि उत्तर प्रदेशातल्या रामपूर हाउंड या जातीच्या श्वानांना प्रशिक्षण देत असल्याची माहिती त्यांनी दिली. या श्वानांच्या धाडसी कामगिरीची माहितीही त्यांनी दिली.

***होल्ड… MKB SHWAN***

**<><><><><>**

२१वं शतक हे भारताचं आणि आसियानचं शतक आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. आसियान-भारत शिखर परिषदेला त्यांनी दूरस्थ पद्धतीनं संबोधित केलं. भारत आणि आसियान, हे संयुक्तरीत्या जगाच्या जवळपास एक चतुर्थांश लोकसंख्येचं प्रतिनिधित्व करतात, असं त्यांनी सांगितलं. या दोघांमधले संबंध फक्त भौगोलिक नाही, तर ऐतिहासिक आणि समान मूल्यांवर आधारित असून, जागतिक अस्थिरतेच्या काळातही त्यात सातत्यपूर्ण प्रगती झाल्याची बाबही प्रधानमंत्र्यांनी अधोरेखित केली.

**<><><><><>**

नीरा देवघर प्रकल्पाच्या उजवा मुख्य कालवा दुसऱ्या टप्प्याच्या प्रारंभासह १ हजार ३५२ कोटी रुपये खर्चाच्या विविध विकास कामांचं भूमिपूजन आणि लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या हस्ते आज फलटण इथं झालं. फलटण आणि माळशिरस या तालुक्यांना या प्रकल्पामुळे पाणी मिळणार असून हरित माणदेश निर्माण करणं हे सरकारचं उद्दिष्ट आहे, असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. नीरा देवघर प्रकल्पातल्या तीन उपसा सिंचन योजनांना सुधारित प्रशासकीय मान्यता दिली जाईल, माळशिरस तालुक्यातल्या २२ गावांना पाणी पोहोचवलं

जाईल, असं आश्वासन त्यांनी दिलं. फलटण-शिंगणापूर रस्त्यावरील नाईक बंबवाडी इथं महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वसाहतीमध्ये औद्योगिक प्रकल्पासह विविध विकासकामं सुरू करण्यात येतील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

यावेळी मुख्यमंत्र्यांनी डॉ. संपदा मुंडे यांच्या आत्महत्येबद्दल दुःख व्यक्त केलं तसंच त्यांच्या मृत्यूला जबाबदार असणाऱ्यांना शिक्षा होईल, असं आश्वासन दिलं.

**<><><><><>**

साताऱ्याच्या फलटण उपजिल्हा रुग्णालयातल्या डॉ. संपदा मुंडे यांच्या आत्महत्येप्रकरणी राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी त्यांच्या कुटुंबीयांची बीड मधल्या कवडगाव इथं भेट घेतली आणि त्यांचं सांत्वन केलं. डॉ. संपदा यांचा मृत्यू वेदनादायी असून, त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी मुख्यमंत्र्यांकडे पाठपुरावा करू असं आश्वासन त्यांनी दिलं.

आमदार सुरेश धस यांनीही डॉ. संपदा मुंडे यांच्या कुटुंबियांची भेट घेतली. या प्रकरणाच्या तपासासाठी भारतीय पोलीस सेवेतल्या महिला अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली विशेष तपास पथक स्थापन करावं अशी विनंती मुख्यमंत्र्यांकडे करणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

दरम्यान, या प्रकरणातल्या गुन्हेगारांना फाशीची शिक्षा झाली पाहिजे अशी मागणी डॉ. संपदा मुंडे यांच्या वडलांनी केली आहे.

**<><><><><>**

विज्ञान क्षेत्रातल्या उल्लेखनीय कामगिरीसाठी दिले जाणारे राष्ट्रीय विज्ञान पुरस्कार आज जाहीर झाले. त्यात जयंत नारळीकर यांना मरणोत्तर विज्ञानरत्न पुरस्कार घोषित झाला आहे. यंदा विज्ञान श्री पुरस्कारासाठी ८ शास्त्रज्ञांची निवड झाली आहे. विज्ञान युवा श्रेणी अंतर्गत, विविध विषयांमध्ये १४ युवा शास्त्रज्ञांची निवड झाली आहे, तर कृषी विज्ञानामधल्या योगदानासाठीचा विज्ञान टीम पुरस्कार, ‘टीम अरोमा मिशन सीएसआयआर’ ला दिला जाईल.

नागपूरच्या नीरी, अर्थात राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्थेचे संचालक डॉ. एस. वेंकट मोहन, यांची यंदाच्या 'विज्ञान श्री' पुरस्कारासाठी निवड झाली आहे. पर्यावरण विज्ञान आणि अभियांत्रिकी क्षेत्रातल्या उल्लेखनीय योगदानासाठी त्यांना हा पुरस्कार दिला जाईल.

**<><><><><>**

आयसीसी महिला क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज नवी मुंबईच्या डी. वाय. पाटील मैदानावर सुरु असलेल्या सामन्यात पावसानं व्यत्यय आणला आहे. पावसामुळे मैदान ओलं झाल्यानं हा सामना उशारा सुरु झाला. भारतानं नाणेफेक जिंकून बांगलादेशाला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केलं. विलंबामुळे हा सामना प्रत्येकी ४३ षटकांचा केला आहे. बांगला देशाच्या तेराव्या षटकात २ बाद ३९ धावा झाल्या असताना पावसामुळे खेळ थांबवावा लागला.

या स्पर्धेत गुणतालिकेत भारत ६ गुणांसह चौथ्या क्रमांकावर आहे. तर बांगलादेश शेवटच्या स्थानावर आहे.

**<><><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा उद्या मुंबईत इंडिया मॅरिटाईम वीक या पाच दिवसीय परिषदेचं उद्घाटन करणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल, गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत आणि ओदिशाचे मुख्यमंत्री मोहन चरण माझी यावेळी उपस्थित असतील.

याशिवाय, गृहमंत्री अमित शहा उद्या माझगांव गोदीत खोल समुद्रात मासेमारी करण्याच्या विशेष नौकांच्या चाव्या लाभार्थ्यांना सुपूर्द करणार आहेत.

**<><><><><>**

राज्याच्या काही भागात आलेल्या पावसानं अनेक ठिकाणी शेतीमालाचं मोठं नुकसान झालं आहे.

**मुंबईत** आज सकाळपासून अधूनमधून पावसाच्या हलक्या सरी कोसळत आहेत.

**नाशिक** जिल्ह्याच्या अनेक भागात अवकाळी पावसानं जोरदार तडाखा दिला असून काढणीवर आलेला कांदा, सोयाबीन, मका, टोमॅटो, द्राक्षं, भाजीपाला पिकांचं मोठं नुकसान झालं आहे.

**गोंदियातही** पावसानं धान पिकाला मोठा फटका बसला. पावसामुळे कापणीला आलेली भाताची रोपं आडवी झाली.

**धुळे** जिल्ह्यात आज पहाटे पुन्हा जोरदार पाऊस झाला. धुळे, साक्री, शिरपूर आणि शिंदखेडा तालुक्यात मध्यम ते जोरदार पाउस पडला.

**पालघर** जिल्ह्यात आज सकाळ पासून अधून मधून हा पाऊस बरसत आहे. काल देखील जिल्ह्यात काही काळ जोरदार पाऊस झाला.

**जालना** शहरासह जिल्ह्यातही पावसाची संततधार सुरू आहे. अधून-मधून पावसाचा जोर वाढत आहे. दरम्यान, शेतामध्ये  वेचणीला आलेल्या कापसाचं या पावसानं नुकसान होत आहे.

**<><><><><>**

गेल्या २४ तासात मध्य महाराष्ट्रात आणि विदर्भात काही ठिकाणी किमान तापमानात लक्षणीय, तर कोकणात तुरळक ठिकाणी किंचित वाढ झाली.

येत्या दोन दिवसात कोकणात अनेक ठिकाणी, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात काही ठिकाणी तर मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली. या काळात कोकण आणि विदर्भात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

**//<><><><><>//**